**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०६**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :- २१/९/२०१३

प्रति,

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती **सभा क्र.०६ बुधवार दि. २५/०९/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक- २५/०९/२०१३ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| १२९ | अहमदनगर महानगरपालिकेचे आयुर्वेद कॉलेज रोड, अमरधारम भिंती लगत येथील १०x१०=१०० चौ. फुटाची खुली जागा ही अर्जदार श्री. शाम शंकर टोणे ,रा.३६, कवडे गल्ली ,नालेगांव ,अ.नगर यांना जागा भाडेतत्वावर १वर्षे कराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १३० | मा. केंद्रशासित UIDSSMT योजनेअंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेचे मा. शासनास सादर करण्यात आलेल्या (१) सावेडी भुयारी गटार योजना (२) केडगाव / सारसनगर भुयारी गटार योजनेचे प्रस्तावास मा. शासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनानुसार सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल मे. सॉलीड कोअर कन्सलटंट यांचेकडून तयार करून घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १३१ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ यापदी डॉक्टरांची अटी व शर्तीनुसार ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर तीन वर्षाकरिता करारबध्द नियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-

प्र.नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- १२९ ते १३१ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०६**

विषय क्रमांक- १२९ बुधवार दिनांक २५/९/२०१३

ठराव क्रमांक - १२९ बुधवार दिनांक २५/९/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आयुर्वेद कॉलेज रोड, अमरधारम भिंती लगत येथील १०X१०=१०० चौ. फुटाची खुली जागा ही अर्जदार श्री. शाम शंकर टोणे ,रा.३६, कवडे गल्ली ,नालेगांव ,अ.नगर यांना जागा भाडेतत्वावर १वर्षे कराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. मार्केट विभाग दि.६/८/२०१३

संदर्भ :- श्री. शाम शंकर टोणे यांचा दि.१/७/२०१३ चा जागा मागणी अर्ज

विनंतीपुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, अर्जदार यांनी विषयांकित जागा मिळणेबाबत दि.१/७/२०१३ अर्ज केलेला होता. मी स्वतंत्र्य सैनिकाचा मुलगा असुन मला कोणताही कामधंदा नसल्याने वरील जागेत मी गेल्या कित्येक वर्षापासुन चहा विक्रीचा व्यवसाय करीत असल्याने ती जागा भाडेतत्वावर मिळावी मी मासिक भाडे भरण्यांस तयार आहे.असे त्यांनी अर्जात नमुद केलेले आहे.

सदर प्रकरणी मा.नगररचनाकार यांना जा.क्र. मार्केट विभाग /१५९ दि.१८/७/२०१३ अन्वये अभिप्राय देणेबाबत कळविले असता १०X१०= १०० चौ.फुट जागा दरमहा भाडे रू.४५०/- व अनामत रक्कम रू.२५०००/- घेवुन एक वर्ष कराराने देणेबाबत. मा.नगररचनाकार यांनी जा.क्र. /टी.पी./६४७१ दि.५/८/२०१३ अन्वये इकडेस कळविले आहे.

तरी अर्जदार श्री. शाम शंकर टोणे यांना आयुर्वेद कॉलेज रोड, अमरधाम भिंती लगत असलेली १०X१० फुट या मोजमापाची मोकळी जागा मा.नगररचनाकार यांनी प्रमाणीत केलेले दरमहा भाडे रू.४५०/- व अनामत रक्कम रू.२५०००/- घेवुन एक वर्ष कराराने देणेबाबत सदरचा प्रस्ताव मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समारे घेणेबाबत आदेशार्थ सविनय सादर. / **अ**

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, **"अ"** नुसार प्रस्ताव मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ ठेवण्यासाठी आदेशार्थ सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- आयुर्वेद कॉलेज रोड, अमरधारम भिंती लगत येथील खुली जागा ही अर्जदार यांना जागा भाडेतत्वावर १वर्षे कराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ. कराळे आ.शि. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेस आवश्यकता भासेल त्यावेळेस महानगरपालिका केव्हही ताब्यात घेउ शकेल या अटीवर देणेस व ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिकेची आयुर्वेद कॉलेज रोड,अमरधारम भिंती लगत येथील १०x१०=१००चौ.फुटाची खुली जागा ही अर्जदार श्री. शाम शंकर टोणे ,रा.३६, कवडे गल्ली ,नालेगांव ,अ.नगर यांना जागा भाडेतत्वावर १वर्षे कराराने दरमहा भाडे रूपये ४५०/-(रू.चारशे पन्नास फक्त)व अनामत रक्कम रूपये २५,०००/-(रू. पंचवीस हजार फक्त) घेउन देणेबाबत तसेच महानगरपालिकेस आवश्यकता भासेल त्यावेळेस महानगरपालिका केंव्हाही ताब्यात घेउ शकेल या अटीवर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :-मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमादेक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- १३० बुधवार दिनांक २५/९/२०१३

ठराव क्रमांक- १३० बुधवार दिनांक २५/९/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** मा. केंद्रशासित UIDSSMT योजनेअंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेचे मा. शासनास सादर करण्यात आलेल्या (१) सावेडी भुयारी गटार योजना (२) केडगाव / सारसनगर भुयारी गटार योजनेचे प्रस्तावास मा. शासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनानुसार सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल मे. सॉलीड कोअर कन्सलटंट यांचेकडून तयार करून घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. पाणी पुरवठा विभाग

संदर्भ : १) सार्व.बांध.विभाग जा.क्र. ४८५ दि. ६/३/२००७ अन्वये कार्यारंभ आदेश

२) मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडे दि. ०८/०१/२०१३ रोजी होणा-या आढावा बैठकीपूर्वी मा.आयुक्त यांना दिलेले निर्देश

३) मा.उपसंचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय,मुंबई यांचे मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांना निर्देशित पत्र क्र.नपप्रस /UIDSSMT / अ.नगर /२०१३ / कक्ष-१३ दि.०८/०१/२०१३

४) मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे येथे दि. ०४/०४/२०१३ रोजीची बैठक

५) मा.मुख्य अभियंता,म.जी.प्रा.यांचेकडील जा.क्र.९०१ दि.२६/०४/२०१३रोजीचे पत्र

६) म.न.पा.चे जा.क्र. १६८ दि. १०/०५/२०१३ रोजीचे पत्र

७) मे. सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांचेकडील दि.१० /०५ / २०१३ रोजीचे पत्र

८) श्री.पी.के. पाटील यांचेशी दि. २३/०५/२०१३ रोजीची चर्चा

मा.सादर,

"अहमदनगर महानगरपालिकेमार्फत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणेसाठी विविध योजनेंचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी म.न.पा. च्या सार्व.बांधकाम विभागामार्फत मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे नमूद योजनांची DPR म.न.पा. स सादर केलेले होते.

१) सावेडी भुयार गटार योजना व २) केडगाव भुयारी गटार योजना

या योजना मा.केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत सादर करण्यात आल्या असता सदर योजनेनां मा.राज्य शासनाच्या अनुक्रमे ६ व्या व ८ व्या SLSC मिटींगमध्ये मान्यता प्राप्त झालेली असून सदर योजना निधी प्राप्तीसाठी मा.केंद्रशासनाकडे सादर करण्यात आले होते. परंतू त्यांचेकडून निधी प्राप्त झालेला नाही.

या संदर्भात मा.प्रधान सचिव,नगरविकासविभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मा.आयुक्त, म.न.पा. यांना या दोनही योजनांचे प्रकल्प अहवाल चालू दरसुचीनुसार नव्याने मा.शासनास सादर करणे बाबत निर्देश दिले.तद्नुसार सदर योजनांचे सन २०११-२०१२ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रके या योजनेचे प्रकल्प अहवाल तयार करणारी एजन्सी मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि., लातूर यांचेमार्फत प्राप्त करून घेण्यात आले. व प्रकल्प अहवालात समाविष्ठ करून प्रकल्प अहवाल नव्याने तयार करण्यात आले.

या अनुषंगाने या दोनही योजनांचे सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल सन २०१२-२०१३ चे दरसुचीनुसार तयार करून म.जी.प्रा. ची तांत्रिक मंजूरी घेण्यात आली तद्नंतर सदरचे प्रस्ताव मा.शासनाकडे मंजूरी करिता सादर करण्यात आले. त्यास दि.१५ /०१/ २०१३ रोजीच्या १६ व्या SLSC च्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली.

या अनुषंगाने मा.केंद्रशासनाच्या CPHEEOचे मा.डयेपूटी ॲडव्हायझर श्री.रविदंर यांनी दि. ०४/०४/१३रोजी मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा पुणे येथे आढावा घेतला. त्यामध्ये सादर केलेल्या DPR मध्ये काही दुरूस्त्या करणे बाबत सुचविले. त्यानुसार मा.मुख्य अभियंता यांचे संदर्भिय पत्र क्र. ५चे पत्र इकडेस प्राप्त झाले असून CPHEEOच्या सदस्यांनी सुचविलेल्या दुरूस्त्या त्वरीत करून सुधारीत प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार संदर्भ पत्र क्र.६अन्वये सदरचे अहवाल सुधारीत करून सादर करणे बाबत मे.सॉलीड कोअर कन्सलटंट यांना कळविण्यात आले होते. परंतू त्यांचे संदर्भिय पत्र क्र.७ म.न.पा. स प्राप्त झाले असून त्यांनी खालीलप्रमाणे कळविले आहे.

१) CPHEO च्या माप दंडाप्रमाणे सन २०११ ची जनगणना आधारभूत मानून योजना पूर्ण होता. पूर्ण होण्याचा कालावधी २ वर्षाचा गृहीत धरून ई २०१५ ते ई. २०४५ या कालावधी साठीची २०४५ च्या लोकसंख्येप्रमाणे योजना प्रकल्प अहवाल तयार करावा लागेल.
२) CPHEO चे मापदंडातही बदल झालेले आहेत व प्रस्तावित लोकसंख्या निर्धारीत करण्याच्या प्रचलीत पध्दतीत ही मा.मुख्य अभियंता म.जी.प्रा.पुणे यांनी त्यांचे दि. ०४/०५/२०१३ च्या पत्रान्वये बदल सुचविलेले आहेत. त्याचप्रमाणे २०१३,२०१५,२०४५ या सालांची लोकसंख्या निर्धारीत करून प्रकल्प अहवाल तयार करावा लागेल.
३) दि. ०४/०५/२०१३ च्या मा.मुख्य अभियंत्याच्या पत्रात निर्देशित केल्याप्रमाणे पाईपच्या CPHEO व इतर पाईपची शक्यता पडताळून प्रकल्प अहवाल तयार करावा लागेल. यापूर्वी फक्त आर.सी.सी. एन.पी. २, एन.पी.- ३. एन.पी.- ४ पाईपचाच वापर मलसंकल्पन व्यवस्थेसाठी प्रचलीत होता.
४) आमच्या आस्थापनाने प्रकल्प अहवाल तयार करते वेळी म्हणजे ई. २००६-२००७ या कालावधीत शहराचे मल : निस्सारण योजनेसाठी सर्वेक्षण केले होते. त्यास सुमारे ६ वर्षाचा कालावधी उलटून गेला असल्यामुळे वाढीव बांधकामे, घरे, वस्त्या झाल्या असण्याची तसेच रस्ते सुधारणा, नविन रेखांकन मंजूर होवून त्याप्रमाणे त्यामध्ये ही बदल होण्याची शक्यता लक्षात घेता पूर्ण शहराचे नव्याने सर्वेक्षण करणे गरजेचे आहे.

या सर्व बाबी लक्षात घेता नव्याने प्रकल्प अहवाल तयार करण्याची गरज असल्यामुळे प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी आवश्यक आहे. तत्कालीन करारनाम्याप्रमाणे प्रकल्प मंजूर झाल्यानंतर ९०% फी अदा करण्यात येईल अशी अट आहे. शासनाचे धोरण आजही " एक शहर एक योजन " असेच असल्यास नगर शहरासाठी पाणी पुरवठा योजना मंजूर होउन काम प्रगतीपथावर असल्यामुळे हा प्रकल्प शासन मंजूर करेलच असे सांगता येत नाही. म्हणून नविन प्रकल्प अहवाल मा.मुख्य अभियंता अथवा समकक्ष प्राधिकरणाने तांत्रिक मंजूरी दिल्यानंतर ७०% फी अदा करण्यात यावी असा बदल आम्हास अपेक्षित आहे.

तरी या सर्व बाबींचा विचार करून आपण वर्कऑर्डर दिल्यावर सदरील प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम सुरू करता येईल व त्यासाठी वक ऑर्डर दिल्यानंतर कमीत कमी २महिन्याचा कालावधी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागेल. तरी याबाबत आम्हाला स्पष्ट निर्देश द्यावेत. "

या अनुषंगाने सादर की,

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत विविध योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आली होती.व तसा दिनांक ०६/०३/२००७रोजी करारनामा करण्यात आला होता. त्यानुसार सावेडी भुयारी गटार योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठीचे देयक त्यांना अदा करण्यात आले असून केडगाव/सारसनगर भुयारी गटार योजनेचे देयक लेखा विभागात अदा करणेसाठी सादर करण्यात आलेले आहे.

CPHEEO चे मा.डयूप्यूटी ॲडव्हायझर यांचे सुचना व मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. यांचे संदर्भिय पत्र क्र.५ अन्वये वरील नमूद दोनही योजनांचे प्रकल्प अहवालामध्ये दुरूस्त्या करणे क्रमप्राप्त आहे.त्यासाठी मध्यंतरी झालेल्या सहा वर्षामधील बदल लक्षात घेता व मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांचे संदर्भिय पत्रानुसार संपूर्ण सर्व्हे पुन्हा करून दोनही योजनांचे प्रकल्प अहवाल एकत्रित नव्याने तयार करावा लागेल. यापूर्वीचे प्रकल्प अहवाल मे. सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांनी तयार केलेले आहे. मा.शासनाच्या निर्देशानुसार सुधारीत अहवाल लवकरात लवकर सादर करणेचे आहे. त्यामुळे सदरचे अहवाल मा.शासनास सादर करणेसाठीचा कालावधी लक्षात घेता सदरचे सुधारीत अहवाल मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. लातूर यांचेकडूनच करून घेणे व त्यांचेशी याबाबत सुधारीत पुरवणी करारनामा करून घेणे उचित वाटते.

दि. २३/०५/२०१३ रोजी मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि.चे प्रतिनिधी श्री. पी.के. पाटील यांचेशी मा.आयुक्त यांचे दालनात चर्चा करण्यात आली. सदरचे सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करणेस श्री. पी.के. पाटील यांनी सहमती दर्शविली. त्यांचेशी झालेल्या चर्चेनुसार यापूर्वीच्या करारनाम्यानुसारच प्रकल्प किंमतीच्या ०.७८% दरानेच नविन प्रकल्प अहवाल तयार करणेचे ठरले. तसेच नव्याने तयार करण्यात येणा-या प्रकल्प अहवालाच्या देयकामधून यापूर्वी अदा केलेली रक्कम वगळून देयक देणेबाबत ठरले. त्यांनी सहमती दर्शविलेली आहे.

त्यामुळे मा.केंद्रशासनाच्या CPHEEO च्या सुचनेनुसार संपूर्ण सर्व्हे व तांत्रिक बदलांसह सुधारीत प्रकल्प अहवाल लवकरात लवकर सादर करणेसाठी मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांचेकडून करून घेणे उचित राहिल.

करिता मे.सॉलीड कोअर कन्सलटंट यांचेशी झालेल्या करारनाम्याची मुदत संपुष्टात आलेली असल्याने त्यांचेशी मागील करारनाम्याला जोडून यांचे करारनाम्यातील देयके अदा करणेच्या वर्गीकरणानुसार खालीलप्रमाणे पुरवणी करारनामा करणे उचित राहिल.

| Sr No | Stages | % Fees entilted to be release | Cummulation % |
|---|---|---|---|
| 1 | Submission of DPR | 10% | 10% |
| 2 | Approval to DPR at AMC | 10% | 20% |
| 3 | After successful Tech. Aproval & sanctioning | 20% | 40% |
| 4 | Administrative Approval by Govt. | 20% | 60% |
| 5 | Release of funds by Govt. | 25% | 85% |
| ६ | After completion of project | 15% | 100 % |

त्यामुळे मा.शासनाच्या निर्देशानुसार सावेडी भुयारी गटार योजना व केडगाव / सारसनगर भुयारी गटार योजना या दोन योजनांचे म.जी.प्रा. च्या सन २०१२-२०१३ च्या दरसुचीनुसार मा.शासनाच्या नविन मार्गदर्शक सुचना नुसार सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांचेमार्फत तयार करून घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर **/ अ**

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, **"अ"** मध्ये नमुद केलेले आहे. त्याप्रमाणे तद्‌वतच यंत्र अभियंता यांचे शिफारसीप्रमाणे १] सावेडी भुयारी गटार योजना व २] केडगाव / सारसनगर भुयारी गटार योजनेचे सुधारित सविस्तर प्रकल्प मे. सॅालीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांचेमार्फत तयार करून घेण्याचे कामास अंदाजे किती खर्च येईल ते पाणी पु.वि. ने नमुद करावे.

यावर कनिष्ठअभियंता पा.पु.वि.यांचा अभिप्राय की, मा.फेरसादर,उपरोक्त विषयांकित योजनेचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल मे.सॅालीड कोअर कन्सलटंट यांचेकडून तयार करून घेणे आहे. सदर प्रकल्प अहवालाची अंदाजे किंमत रू.२७५कोटी इतकी अपेक्षित आहे.त्यांचेशी यापुर्वी झालेल्या करारनाम्यानुसार०.७८%इतक्या दराने सदरचा खर्च अंदाजे रू.२.१४कोटी इतका अपेक्षित आहे.

परंतु यापुर्वी केडगाव भुयारी गटार योजना व सावेडी भुयारी गटार योजना या दोन कामांचे स्वतंत्र DPR तयार करणेच्या अनुषंगाने मे. सॅालीड कोअर कन्सलटंट यांना रू.८७,५४,०००/-इतके देयक अदा करणेबाबत शिफारस करण्यात आलेली आहे. त्यामुळे शिफारस केलेली रक्कम वगळता अंदाजे रू.१.३०कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तथापि मा. शासनाच्या सुचनेनुसार सुधारित एकत्रित सविस्तर प्रकल्प अहवाल मे.सॅालीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांचेमार्फत तयार करून घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा. स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./**अ**

यावर पाणी पुरवठा विभाग यांचा अभिप्राय की, नमूदप्रमाणे अपेक्षित खर्च असून प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, **"अ"** प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, **"अ"** नुसार मान्य.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः-मा.केंद्रशासित UIDSSMTयोजनेअंतर्गत(१)सावेडी भुयारी गटार योजना(२) केडगाव/ सारसनगर भुयारी गटार योजनेचे प्रस्तावास मा.शासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनानुसार सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल मे.सॉलीड कोअर कन्सलटंट यांचेकडून तयार करून घेणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- मंजुरी कशी देणार. मंजुरी कशास देत आहोत.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचा.

ऑफिस रिपोर्ट वाचन करण्यात आले.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- सॉलीड कोअरला आपण काम देणार आहे ते काम करणारे अधिकारी आपल्याकडे आहेत का नाहीत. नसले तर भरत का नाहीत. महानगरपालिकेकडे सक्षम अधिकारी आहेत की नाही त्याकरिता नव्याने अेजन्सीला कामे दयावे लागतात. पालिकेकडून तयार करून घेता येत नाही.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- मॅके.इंजि. निकम सांगा.

मेकॅ. इंजि श्री. निकम पी.जे. :- सक्षम अधिकारी आहेत की नाही असा प्रश्न विचारला आहे.

मा.सभापती साहेब :- मोठे काम आहे.

उपायुक्त (सा.) डॉ.डोईफोडे :-२००६-२००७ ला मंजूरी दिलेली आहे. DSR च्या फरकानुसार नव्याने कार्योत्तर मंजुरी घेण्यात येत आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र . :- कार्योत्तर मंजुरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा. सौ. गंधे सु.मो. :- कार्योत्तर मंजुरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट कार्योत्तर मंजुरी असल्याने सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** मा. केंद्रशासित UIDSSMT योजनेअंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेचे मा. शासनास सादर करण्यात आलेल्या (१) सावेडी भुयारी गटार योजना (२) केडगाव / सारसनगर भुयारी गटार योजनेचे प्रस्तावास मा. शासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनानुसार एकत्रित सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल म्हणजे अहमदनगर शहर भुयारी गटार योजना यापुर्वीची एजन्सी मे.सॉलीड कोअर कन्सलटंट , प्रा.लि. लातूर यांचेकडून तयार करून घेणेस व प्रकल्प किंमतीच्या ०.७८% दरानेच नवीन प्रकल्प अहवाल खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तथापि नव्याने तयार करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालाच्या देयक अदा करतांना यापूर्वी तयार करण्यांत आलेल्या देयकाची रक्कम वगळून देयक अदा करणेबाबत दक्षता घेण्यांत यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर .

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :-मा. श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- १३१ बुधवार दिनांक २५/९/२०१३

ठराव क्रमांक- १३१ बुधवार दिनांक २५/९/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ यापदी डॉक्टरांची अटी व शर्तीनुसार ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर तीन वर्षाकरिता करारबध्द नियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्था./ वर्क.११७ दि.१०/९/२०१३

संदर्भ :- १. कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह जा.क्र. ३७४ दि.११/७/२०१३ अन्वयेचा प्रस्ताव

२. सदर प्रस्तावावर इकडील जा.क्र. आस्था.२३८४ दिनांक २२/७/२०१३ अन्वये मा.प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना पाठविलेले पत्र.

३. मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील कै.बा.दे.दवा. जा.क्र. ४५४ दि.५/८/२०१३ अन्वयेचे पत्र.

सादर,

विनंती की ,मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह जा.क्र.३७४ दि.११/७/२०१३अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये " कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते. आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञाचे पद मंजुर नसल्यामुळे जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक९९६७दि.२०/३/२०१३अन्वये डॉ.अनिरूध्द गिते व डॉ.सुचित तांबोळी यांची सहा महिन्या करीता ऑननरी बालरोग तज्ञ म्हणून ३१/१२/२०१२ ते ३०/०६/२०१ अखेर नेमणूक करण्यात आलेली होती.सदरच्या नेमणूकीची मुदत दि.३०/६/२०१३रोजी संपत आहे. मात्र याच दरम्यान आर.सी.एच.फेज-२या कार्यालयाकडून कै.बा.दे.दवाखान्या करीता कंत्राटी पध्दतीने डॉ.श्री.डोंगरे बालरोग तज्ञ यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.सदरचे नेमणूक करण्यात आलेले बालरोगतज्ञ हे दररोज कै.बा.दे.दवाखाना येथे बालरूग्णांची ओपिडी (बाहयरूग्ण विभाग) तसेच दवाखान्यामध्ये जन्म घेणा-या नवजात बालकांची तपासणी व उचाराकरीता झालेले आहेत. मात्र ऑनकॉल बेसीसवर बालरोग तज्ञ डॉक्टर इमर्जन्सी सिझेरीयन शस्त्रक्रिया दरम्याना बालकांची तपासणी व उपचारकामी नेमणे आवश्यक आहे. सबब शहरातील इच्छुक बालरोग तज्ञांचे अर्ज मागवुन त्यांना इमर्जन्सी कॉल करीता रू.१५०/-प्रति पेशंट/ प्रति व्हिजीट या प्रमाणे फी अदा करणे उचित वाटते तसेच सदरची नेमणूक ही एकत्रीत मानधनावर करण्यात येणार नसुन फक्त आवश्कता भासल्यास उपलब्ध बालरोग तज्ञांना बोलावुन त्यानुसार प्रती तपासणी/ प्रती व्हीजीट नुसार फी अदा करण्यात येणार आहे. यापुर्वी कै.बा.दे.दवाखान्याकरिता वरीलप्रमाणे संदर्भ क्र.१व २नुसार भुलतज्ञ व स्त्रीरोग तज्ञांचा व्हिजीट बेसवर पॅनल नेमण्यात आलेला आहे. तसेच पॅनलची नेमणूक केल्यानंतर एखादा बालरोग तज्ञांनी पॅनलमध्ये नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केल्यास त्याच्या अर्जाचा विचार करून प्रस्ताव ठेवुन नियमाप्रमाणे पॅनलमध्ये त्यांना समाविष्ट करण्यात येईल. तरी कै.बा.दे. दवाखान्यामध्ये जन्म घेणा-या नवजात बालकांच्या इमर्जन्सी कॉल करीता रू.१५०/- प्रति पेशंट / प्रति व्हीजीट या प्रमाणे फी अदा करून शहरातील इच्छुक बालरोग तज्ञांचे अर्ज मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे. दवाखाना यांचा मार्फत मागवुन तीन वर्षाकरीता पॅनलशिपवर नेमणूक करणेस प्रस्ताव मंजुरीस्तव व आस्थापना विभागास पुढील कार्यवाहीस्तव आदेशार्थ सविनय सादर." असे नमुद करून सुचीत केलेले आहे.

सदर प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग प्रमुख यांनी " प्रस्तावीत "अ" प्रमाणे "कै.बा.दे. दवा. व प्रसुतीगृह येथे मानसेवी बालरोग तज्ञ डॉक्टरांची सेवा अत्यावश्यक आहे. सदर डॉक्टर हे ऑनकॉल बेसीसवर प्रती व्हीजीट नुसार पॅनलशीपवर मुख्य वैद्यकीय अधिकारी मार्फत इच्छुकांचे अर्ज मागवुन प्रस्तावित करून आस्थापना मार्फत तीन वर्षाकरीता नियुक्त करणे उचित वाटते तरी मंजुरीसतव तथापि आदेशार्थ सादर." असे नमुद करून शिफारस केलेली आहे.

वरील संदर्भ क्र.१ च्या मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे प्रस्तावामध्ये सोबत बालरोग तज्ञांच्या नांवाची यादी व त्यांचे सर्वाचे अर्ज तसेच तीन वर्षाच्या कालावधीतील दिनांक व तद्अनुंषीक सविस्तर माहिती नमुद केलेली नसल्याने याबाबतची सविस्तर माहिती तात्काळ इकडेस पत्रान्वये पाठविणे बाबत मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना इकडील जा.क्र. आस्था./ २३८४ दिनांक २२/७/२०१३ अन्वये पत्राने कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे कडील कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह जा.क्र. ४५४ दिनांक ५/८/२०१३ अन्वये खालील प्रमाणे पत्रामध्ये नमुद करून सुचित केलेले आहे.

कै.बा.दे.दवाखान्यासाठी शहरातील इच्छुक व अनुभवी बालरोगतज्ञ डॉक्टारांचा व्हिजीटबेसवर पॅनलशिपवर नेमणूक करणे बाबत प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांच्या मंजुरीने आपल्या विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.सदरचा पॅनल तयार करणे कामी बालरोग तज्ञ संघटना, अहमदनगर यांना पत्र देउन शहरातील इच्छुक डॉक्टरांचे अर्ज कै.बा.दे.दवा. येथे जमा करणेस सुचित करण्यात आलेले आहेत. सदरच्या संस्थेतील सभासदांनी पॅनलशिपवर काम करणेस इच्छुक असलेबाबत कै.बा.दे. दवा. येथे अर्ज जमा केलेले आहेत. तसेच पॅनल तयार करण्याच्या कार्यवाहीला काही कालावधी लागणार असल्याने दिनांक ३०/६/२०१३ मानधनची नेमणूक संपल्यानंतर २/७/२०१३ पासून दवाखान्यामध्ये नवजात बालकांची तपासणी कामी गैरसोय होउ नये म्हणुन यापुर्वी, मानधनावर नेमणूक करण्यात आलेल्या बालरोग तज्ञ डॉ. श्री. सुचीत तांबोळी व डॉ.अनिरूध्द गिते यांना नवजात बालकांना तपासण्याकरीता बोलविण्यात येत आहे. तरी डॉ. श्री. सुचीत तांबोळी व डॉ.अनिरूध्द गिते यांची दिनांक २/७/२०१३ पासून तीन वर्षाकरिता पॅनलवर नेमणूक करणेस व उर्वरीत डॉक्टरांची प्रस्ताव अखेर मंजुरीनंतर तीन वर्षाची नेमणूक करणेत यावी. तरी वरील प्रमाणे प्राप्त अर्जाची पडताळणी व छाननी करून खालील पात्र डॉक्टरांची यादी व अर्ज पॅनलशिपवर नियुक्ती करणे कामी आपणाकडे पाठविण्यांत येत आहे. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

सदर पत्रासोबत शहरांतील इच्छुक बालरोग तज्ञ यांची नांवे समाविष्ट करण्यात आलेले असुन त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | डॉ.श्री. सुचीत तांबोळी |
| २ | डॉ. श्री. अनिरूध्द गिते |
| ३ | डॉ.श्री. जयदिप जगताप |
| ४ | डॉ. श्री. अमोल सिताराम तोडमल |
| ५ | डॉ.श्री. अनंतकुमार किशोर भांगे |
| ६ | डॉ.श्री. सचिन सुखदेव पालवे |

| | |
|---|---|
| ७ | डॉ.श्री. सागर रामनाथ वाघ |
| ८ | डॉ.श्री. सुभाष प. फिरोदिया |
| ९ | डॉ.श्री. दिपक आर. करपे |
| १० | डॉ.श्री. रामदास बांगर |
| ११ | डॉ.श्री. प्रताप पटारे |
| १२ | डॉ.श्री. शहनाज अय्युब |

यापुर्वी मा.प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह ९७६ दिनांक ९/१/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑननरी डॉक्टर) यापदी अटी व शर्ती प्रमाणे १] डॉ.श्री. अनिरूध्द गिते, २] डॉ. सुचित तांबोळी यांची कंत्राटी करारानुसार दरमहा रू.१५००/- या मानधनावर दिनांक ३१/१२/२०१२ ते दिनांक ३०/६/२०१३ अखेर सहा महिन्याच्या कालावधी करीता जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणुक ९९६७ दिनांक २०/३/२०१३ अन्वये करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती.

संबंधितांची सदरच्या केलेल्या करारबध्द नियुक्ती कालावधीतील करारबध्द नियुक्तीची मुदत ही दिनांक ३०/६/२०१३ रोजी समाप्त झालेली आहे.

वरील केलेल्या करारबध्द नियुक्ती कालावधीतील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव जा.क्र. आस्था./ वर्क.२७१ दिनांक २५/३/२०१३अन्वये मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने स्थायी समिती ठराव क्र.१३दि.८/४/२०१३अन्वये ठराव पारित करून संबंधितांच्या केलेल्या पॅनलशिपवरील कालावधीतील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवाखाना यांचे उपरोक्त संदर्भिय क्र. १ व ३ अनुषंगाने व सदर प्रस्तावावरील मा.प्र.आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांचे उपरोक्त केलेल्या शिफारशी नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे नागरिकांच्या दृष्टीकोनातुन तातडीने अत्यावश्यक सेवेचा विचार होवून अंतर्गत खास बाब म्हणून कंत्राटी करारानुसार ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ यापदी डॉक्टरांची अटी व शर्ती अनु.क्र. १] डॉ. श्री. सुचीत तांबोळी व २ ] डॉ.श्री. अनिरूध्द गिते यांची दिनांक २/७/२०१३ पासून तीन वर्षाकरीता तसेच उर्वरीत अनु. क्र.३ ] डॉ.श्री. जयदिप जगताप ४] डॉ.श्री. अमोल सिताराम तोडमल,५] डॉ.श्री. अनंतकुमार किशोर भांगे, ६] डॉ.श्री. सचिन सुखदेव पालवे, ७] डॉ.श्री. सागर रामनाथ वाघ, ८] डॉ.श्री. सुभाष प. फिरोदिया , ९] डॉ.श्री. दिपक आर. करपे, १०] डॉ.श्री. रामदास बांगर, ११] डॉ.श्री. प्रताप पटारे , १२] डॉ.श्री. शहनाज अय्युब यांची सदरच्या प्रस्तावास अखेर मंजुरी नंतर तीन वर्षाकरीता इमर्जन्सी कॉल करीता रू.१५०/- प्रति पेशंट/ प्रति व्हीजीट या प्रमाणे फी अदा करून ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती बाबत सदरच्या प्रस्ताव मा.आयुक्त साहेब, मा.उपायुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समिती पुढे मंजूरीसाठी सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ यापदी डॉक्टरांच ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- पर्मनंट बालरोग तज्ञ आवश्यक नाही का ?

प्र. आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :- स्टाफिंग पॅटर्नमध्ये मंजुरी करिता प्रस्तावीत केले आहे. मा. शासनाची मंजुरी मिळेपर्यंत हे ऑनकॉल नेमणूकीचा प्रस्ताव सादर केला आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- पाणी पुरवठा विभागाकडे कर्मचारी कमी आहेत बांधकाम विभागाकडे कर्मचारी कमी आहेत. रिपोर्ट केला का

मेकॅ.इंजि.श्री. निकम पी.जे. :- याबाबत आम्ही प्रस्ताव आस्थापना विभागाकडे सादर केलेला आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- आस्थापानाचे कोण आहे रिपोर्ट घेउन या. बांधकाम चे कोण आहेत त्यांनाही रिपोर्ट आणायला सांगा.

मा.सभापती साहेब :- कर्मचारी कमी असले तरी आहे त्या कर्मचा-याकडून काम करून घेतले पाहिजे.

आस्थापना विभाग श्री. खोलम :- २०१० पासून प्रस्ताव दिले त्यानुसार -२०० पद मंजूर आहे १६८ पद भरलेले होते कार्यरत १९२ आहेत म.जि.प्रा. १११ पद मंजूर, टेक्नीकल स्टाफची संख्या कमी आहे वेळोवेळी प्रमोशन दिले. विदयुत परिक्षक, गाळणी निरीक्षक ही पदे रिक्त आहेत. निवड समिती मध्ये पाठवाली होती. पात्र उमेदवार नसल्याने भरता आले नाही. खुली पदे असल्याने आस्थापना खर्च ५७% असल्याने सरळसेवेने भरता येत नाही. त्यानंतर पात्र कर्मचारी व त्या पदांवर काम करण्यास तयार कर्मचारी यांची नांवे मागवली. पाणी पुरवठा विभागाने कर्मचारी तयार नाही असे कळविले आहे.

मा.श्री.शेख आरिफ शे.र. :- फिटर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांची नावे कळविण्याबाबत माहिती मागीतली. त्यांचे काय ?

मेकॅ.इंजि. श्री. निकम पी.जे. :- टेंपररी कर्मचारी नेमणूकीबाबत कार्योत्तर मंजूरी मिळाली नसल्याने पंपचालक नेमणूकीबाबत सहा महिन्याची मुदत संपल्यानंतर पुन्हा रिपोर्ट मागीतला जातो.पंपचालक वगैरे ची मुदत संपली आहे.नवीन रिपोर्ट प्रत्येक वेळी करावा असे आस्थापनाचे म्हणणे आहे.

उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे :- त्याच लोकाना नेमणूक दयायची का तसेच आता आवश्यकता आहे किंवा नाही ते कळवा. कर्मचारी काम करत नसेल तर स्वतंत्र कळविण्यांत यावे.

मेकॅ.इंजि. श्री. निकम पी.जे. :- आवश्यक नसले तर तसेच काम व्यवस्थित करीत नसेल तर तसा रिपोर्ट मी करील.

उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे :- मान्यता व आवश्यकता गृहीत धरून कर्मचा-यांना मागच्या तारखेपासून नेमणूक देण्यांत यावी व कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- कचरा संकलन ठेक्याची मुदत संपली का ?

उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकर :- असा ठेका दिला नाही. टेंडर ओपन केले नाही. तांत्रिक अडचणी आहेत.टेंडर मुदतवाढ देणेबाबत मा.आयुक्त साहेब यांचेशी चर्चा झाली प्रत्येक झोनला स्वतंत्र फॉर्म भरणे गरजेचे होते. एकच फॉर्म भरण्यांत आल्याने ठेकेदारांनी फॉर्म भरण्यासाठी यात मुदत वाढ दिलेली आहे.

मा.सभापती साहेब :- हे तुमच्या आधी लक्षात आले नाही का ?

उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकर :- प्रत्येक झोनकरीता स्वतंत्र टेंडर येणे आवश्यक आहे त्याप्रमाणे टेंडर आले नाही.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- प्रत्येक झोन करता टेंडर यावे म्हणून मुदतवाढ दिली आहे. कंडीशन मध्ये चार फॉर्म भरणेबाबत तरतूद केली आहे. त्यामुळे चार झोनला स्वतंत्र फॉर्म भरले जातील. त्यामुळे भविष्यात टेंडर बाबत तक्रारी राहणार नाहीत.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- किती दिवसात काम होईल.

उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकर :- ओपन केले जाईल. नंतर छाननी समिती होउन सादर केले जाईल.

मा.सभापती साहेब :- छाननी स्थायी समिती करील. ओपन झाल्यानंतर तीन दिवसात सादर करा.

मा.सौ. कराळे आ. शि. :- कचरा कुंडया मिळातील का ?

उपआरोग्याधिकारी डॉ. पैठणकार :- टेंडरची प्रक्रिया चालू आहे टेंडर झाल्यानंतर १० ते १५ दिवसात कंटनेर येतील

मा.श्री. कवडे उ.खं. :- विषय मंजूर करा.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- विषय मंजूर करा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात बालरोगतज्ञ यापदी डॉक्टरांची अटी व शर्तीनुसार ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर तीन वर्षाकरिता इमर्जन्सी कॉल करीता रू.१५०/- प्रति पेशंट /प्रति व्हीजीट याप्रमाणे फी अदा करणेस ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद बालरोग तज्ञांची करारबध्द नियुक्तीस मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव. सही /-

अनुमादेक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका